जा.क्र.2018/मशाका/गौख/कावि-670
जिल्हाधिकारी कार्यालय, जालना
दिनांकः 28.06.2018

मौ.सावंगी येथील दर्गा जवळील कुकुटपालन शेजारी व दर्गाच्या पाठीमागे जुने गावठाणजवळ, मौ.देऊळझरी ता.जाफ्राबाद येथे गट नं.१९१ जुने गावठाण व स्मशान भुमीजवळ व मौ.उस्वद ता.मंठा येथे विविध ठिकाणी जप्त केलेल्या अवैध वाळुसाठयाचा लिलाव ई-टेंडरींग व ई-ऑक्शन पध्दतीने खालील वेळापत्रकानुसार करण्याबाबतचे जाहीर प्रगटन. (प्रथम वेळ)

| अ. क्र. | दिनांक | तपशिल |
|---|---|---|
| 1 | 29.06.2018 | सकाळी 10.00 वाजेपासुन बिडर रजिष्ट्रेशन ऑनलाईन पध्दतीने (संगणकीय नोंदणी) सुरु होईल. |
| 2 | 04.07.2018 | सायंकाळी 05.00 वाजता बिडर रजिष्ट्रेशन ऑनलाईन पध्दतीने (संगणकीय नोंदणी) बंद होईल. |
| 3 | 01.07.2018 | सकाळी 10.00 वाजेपासुन ई-निविदा ऑनलाईन (संगणकीय) पध्दतीने भरणे सुरु होईल. |
| 4 | 06.07.2018 | सायंकाळी 05.00 वाजता ई-निविदा ऑनलाईन (संगणकीय) पध्दतीने भरणे बंद होईल. |
| 5 | 07.07.2018 | ई-ऑक्शन सकाळी 11.00 वाजेपासुन ते दुपारी 02.00 वाजेपर्यंत.<br>मौ.उस्वद ता.मंठा व मौ.सावंगी, मौ.देऊळझरी ता.जाफ्राबाद येथील अवैध वाळुसाठयासाठी प्रस्तावित हातच्या किंमतीपेक्षा अधिकची ई-बोली लिलावधारकास बोलावी लागेल.<br>ई-ऑक्शन व ई-टेंडरींग यातील महत्तम रकमेचा लिलाव मंजूर करण्यात येईल. |
| 6 | 07.07.2018 | वरीलप्रमाणे ई-ऑक्शनची प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर त्याच दिवशी दुपारी 4.00 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे ई-निविदा डाऊनलोड करुन उघडण्यात येईल.<br>ई-ऑक्शन व ई-टेंडरींग यातील महत्तम रकमेचा लिलाव मंजूर करण्यात येईल. |

लिलावाच्या इतर अटी व शर्ती जालना जिल्हयाचे अधिकृत संकेतस्थळ www.jalna.nic.in वर व https://jalnaco.abcprocure.com वर प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

राजेश जोशी
**निवासी उपजिल्हाधिकारी तथा**
**प्र.अपर जिल्हाधिकारी जालना**

# जाहीर सुचना.

1. जालना जिल्हयातील मौ.सावंगी व देऊळझरी ता.जाफ्राबाद व मौ.उस्वद ता.मंठा येथे अनाधिकृतपणे साठवलेल्या व जप्त केलेल्या अवैध वाळुसाठयाचा (ई-निविदा व ई-ऑक्शन) प्रणालीद्वारे ई-लिलाव करण्यात येत आहे. वाळु लिलावाच्या अटी व शर्ती तसेच वाळुसाठयाची सरकारी किंमत व इतर सर्व माहिती गौण खनिज विभाग जिल्हाधिकारी कार्यालय, जालना तसेच सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालय, सर्व तहसिल कार्यालये, जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग या जालना जिल्हयातील कार्यालयांच्या नोटीस बोर्डावर तसेच https://jalnaco.abcprocure.com व www.jalna.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्द केली गेली आहे.
2. ई-निविदा (e-tendering) व ई-लिलाव (e-auction) प्रक्रियेत भाग घेणा-यांना वैध डिजीटल सिग्नेचर (Signing + encryption) प्राप्त करणे आवश्यक राहील. नव्याने डिजीटल सिग्नेचर मिळविण्याकरिता Pan Card, वाहन परवाना, पासपोर्ट साईजचा फोटो, यांच्या हार्ड कॉपी सक्षम प्रमाणिकरण प्राधिकरणांस (Certifying authority) सादर करुन डिजीटल सिग्नेचर मिळविता येईल.
3. वाळु लिलावाची प्रक्रिया ही ई-निविदा (e-tendering) व ई-लिलाव (e-auction) हया दोन्ही प्रक्रियेद्वारे राबविली जाईल. ई-निविदा (e-tendering) प्रक्रियेत भाग घेतांना संबधिताने https://jalnaco.abcprocure.comया वेबसाईटवर ई-निविदा खरेदी करावी. ई-निविदा खरेदी करण्यासाठी ई-मेल आयडी, मोबाईल नंबर, पॅन कार्ड, टिन प्रमाणपत्र, करारपत्र/प्रतिज्ञापत्र मागील ०२ वर्षाचे आयकर व विक्रीकर विवरणपत्र, आयकर व विक्रीकर विभागाचे ना-देय प्रमाणपत्र, रहीवासी दाखला इत्यादी कागदपत्रे अपलोड करुन सादर करणे आवश्यक आहे. तसेच ई-निविदा भरत असतांना अर्ज शुल्क Debit card/Credit Card,/Net Banking या माध्यमातुन व अनामत रक्कम Debit card/Credit Card/Net Banking/NEFT/RTGS या माध्यमातुन जिल्हा खनिकर्म अधिकारी यांचे बॅंक खात्यावर ऑनलाईनच जमा करणे आवश्यक आहे.
4. वाळु लिलवाची प्रक्रिया निविदा (e-tendering) व ई-लिलाव (e-auction) मध्ये काही तांत्रीक अडचणी निर्माण झाल्यास हेल्पलाईन क्रमांक क्रमांक +91 – **07940016811, 07940016840, 07940016848, 07940016866, 09099090830** तसेच paresh@abcprocure.com, pooja@abcprocure.com, rizwan@abcprocure.com या email id वर संपर्क साधण्यात यावा.
5. लिलावाच्या ई-टेंडर व ई-ऑक्श्न पध्दतीमध्ये तांत्रीक अडचणी बाबत हेल्पलाईन क्रमांक +91- 07940270555, 07940270569, 07940270507, 09374519729, 07940270596, 07940270566, 09374519754 वर संपर्क साधावा अथवा support@abcprocure.com या email id वर संपर्क साधण्यात यावा.
6. सदरील हेल्पलाईन क्रमांक सोमवार ते शुक्रवार सकाळी 10.00 ते सांय.06.00 वाजेपर्यंत तसेच महिन्याचा पहिला व तिसरा शनिवारी सकाळी. 10.00 ते सांय.06.00 या वेळेत संपर्क साधण्यात यावा. काही तांत्रीक अडचण आल्यास त्यास सर्वस्वी जबाबदारी abc e-procurement या शासन नियुक्त कंपनीवर राहील, त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
7. ज्या वाळुसाठयाची हातची किंमत रुपये 10,00,000/- (दहा लक्ष रुपये) व त्यापेक्षा जास्त असेल अशा वाळुघाटासाठी अर्ज फी 6593/- व ज्या वाळुसाठयाची हातची किंमत रुपये 10,00,000/- (दहा लक्ष रुपये) पेक्षा कमी असेल अशा वाळुघाटासाठी अर्ज फी रु. 3593/- ऑनलाईन पध्दतीने भरणा करावी लागेल, सदरची रक्कम ही ना-परतावा राहील.
8. लिलावासाठी प्रसिध्द केलेल्या वळुघाटाच्या हातच्या किंमतीवर भरावयाची अनामत रक्कम निश्चित करुन प्रसिध्द केलेली आहे. अनामत रक्कम Debit card/Credit Card,/Net Banking/NEFT/RTGS याद्वारे ऑनलाईन जमा करण्यात यावी.
9. लिलावधारकास सर्वप्रथम नोंदणी करणे आवश्यक राहील, त्यानतंरच लिलावधारकास ई-टेंडरींग व ई-ऑक्शन प्रक्रियेमध्ये भाग घेता येईल. यासाठी Registration Fees रुपये 2950.00 Debit card/Credit Card,/Net Banking द्वारे e-procurement technologies.ltd (abc procure) याचे खात्यावर जमा करण्यात यावी.
10. ई-ऑक्शन प्रक्रिया पुर्ण झाल्यानतंर ई-निविदा उघड करण्यात येईल ज्यांनी e-tender (ई-निविदा) मध्ये भाग घेतला आहे फक्त त्यांनाच e-auction मध्ये भाग घेता येईल. त्यांना https://jalnaco.abcprocure.com या वेबसाईटवर जाऊन ऑनलाईन

बोली टाकता येईल व त्यासोबत वर नमुद केलेल्या परिच्छेद नंबर 03 मधील कागदपत्राच्या मुळ प्रती जिल्हाधिकारी कार्यालय, गौण खनिज विभागात दुस-या दिवशी दुपारी 03.00 वाजेपर्यंत पुढील तपासणीसाठी सादर करणे आवश्यक राहील. त्यानंतरच संबधितास Approval दिल्या जाईल. Digital Signature Certificate, Registration and Profile Approval बाबत अडचण उद्भवल्यास +91 –07940166866 व 07940016838 या नंबर वर संपर्क साधावा.

11. ज्यांना एका पेक्षा अधिक वाळुसाठयाची ई-निविदा व ई-ऑक्शन मध्ये भाग घ्यावयाचा आहे, त्यांनी प्रत्येक वाळुसाठा निहाय स्वतंत्रपणे अर्ज फी व अनामत रक्कम जमा करणे आवश्यक राहील. या रकमा स्वतंत्रपणे वर नमुद पध्दतीने जमा कराव्यात, एकत्रित रक्कम जमा करुन नये.
12. तसेच ज्यांना एकाच वाळुसाठयाच्या ई-निविदा तसेच ई-ऑक्शन प्रक्रियेध्ये भाग घ्यावयाचा आहे, त्यांना त्याच वाळुसाठयाची ई-टेंडरीग नतंर ई-ऑक्शनसाठी अनामत रक्कम व अर्ज फी पुन्हा भरण्याची आवश्यकता नाही.
13. ई-ऑक्शन किमान बोली ही ई-टेंडरीग मध्ये आलेल्या सर्वोधिक बोलीपेक्षा अधिक रकमेसाठी संबधितास लावावी लागेल. एकदा ई-ऑक्शनसाठी बोली आल्यास /अपलोड झाल्यास व त्यानंतर 10 मिनिटात नवीन अधिकची बोली प्राप्त न झाल्यास नोंदलेली बोली ही अंतीम राहील, व ई-ऑक्शन संगणकीय प्रणाली अपोआपाच बंद होईल. शेवटच्या 05 मिनिटात प्राप्त बोली अपलोड झाल्यानतंरच पुढील बोलीसाठी 10 मिनिटाचा कालावधी आपोआप वाढेल. तथापी, पहिल्या दिवशी ई-ऑक्शन कार्यक्रम सुरु झाल्यानतंर एखादी किंवा त्यानतंरची एक व अधिकची बोली प्राप्त झाल्यास बोलीप्रमाणे अपडेट होत राहील. तथापी, 10 मिनिटाचा कालावधी ही 03 वेळेसच वाढवुन मिळेल, अशी शेवटची बोली आल्यास ही बोली अंतीम राहील.
14. ई-ऑक्शन मध्ये लिलावधारकास किमान रुपये 10,000/- व त्याच्या पटीतच बोली लावता येईल. ई-ऑक्शन प्रक्रिया थांबल्यानतंर/ संपल्यानतंर दुस-या दिवशी सदर वाळुसाठयाची ई-ऑक्शन मधील सर्वोच्च किंमत जाहीर केली जाईल.
15. वाळु-लिलाव संबधिचे वेळापत्रक https://jalnaco.abcprocure.com व www.jalna.nic.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.
16. लिलवाच्या अटी व शर्ती सोबतच्या परिशिष्ट-1 मध्ये नमुद आहेत. या अटी /शर्ती मान्य झाल्यावर ई-टेंडरींग व ई-ऑक्शन मध्ये भाग घेता येईल.
17. प्रस्तावीत वाळुसाठयाच्या सदर्भात अन्य काही तक्रारी /आक्षेप /सुचना प्राप्त झाल्यास त्याची तपासणी/चौकशी केल्यानंतर व लिलाव न करण्याची सबळ कारणे अपर जिल्हाधिकारी, जालना यांची खात्री झाल्यास लिलावाची प्रकिया स्थगित करण्यात येईल.
18. ई-निविदा सुचनेमध्ये नमुद केलेल्या वेळापत्रकानुसार ई-निविदा/ई-ऑक्शन/फॉर्म खरेदी /डाऊनलोड /बीड भरणे/बीड समाविष्ट करणे/अनामत रक्कमा जमा करणे ही सर्व प्रक्रिया विहीत वेळेत पुर्ण करणे अत्यावश्यक आहे, याची नोंद घ्यावी.
19. वाळुसाठयाच्या निश्चित करण्यात आलेल्या अपसेट प्राईज (हातची किंमत/सरकारी किंमत) पेक्षा अधिक रकमेची ई-निविदा /ईऑक्शन दाखल करणे आवश्यक आहे.
20. ज्याची ई-निविदा स्विकारण्यात येणार नाही, त्याची अनामत रक्कम दुस-या दिवशी ऑनलाईन परत करण्यात येईल.
21. ई-टेंडरीग (ई-निविदा) अथवा ई-ऑक्शन (ई-लिलाव) स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे सर्व अधिकार अपर जिल्हाधिकारी जालना यांचेकडे राखुन ठेवण्यात आले आहेत.

राजेश जोशी

**निवासी उपजिल्हाधिकारी तथा**

**प्र.अपर जिल्हाधिकारी जालना**

## परिशिष्ट-1

**मौ.सावंगी येथील दर्गा जवळील कुकुटपालन शेजारी व दर्गाच्या पाठीमागे जुने गावठाणजवळ, मौ.देऊळझरी ता.जाफ्राबाद येथे गट नं.१९१ जुने गावठाण व स्मशान भुमीजवळ व मौ.उस्वद ता.मंठा येथे विविध ठिकाणी जप्त करण्यात आलेल्या अवैधरित्या साठवलेल्या वाळुसाठ्यांचा लिलाव ई-निविदा व ई-ऑक्शन पध्दतीने करणेबाबत.**

1. लिलावधारकास ई-निविदा व ई-ऑक्शनमध्ये या दोन्ही प्रक्रियेमध्ये सहभाग घेता येईल तसेच ई-निविदा व ई-ऑक्शनमध्ये भाग घेणा-या लिलावधारकास मान्यताप्राप्त संस्थेकडून डिजीटल सिग्नचर प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. त्यासाठी पॅनकार्ड, ड्रायव्हिंग लायसन, मोबाईल नं, इलेक्शन कार्ड किंवा बॅकेचे फोटो असलेले पासबूक तसेच रहिवासी पुराव्यासाठी लाईट बिल इत्यादी साक्षांकित कागदपत्रे आवश्यक आहे.
2. ई-निविदा व ई-ऑक्शन प्रक्रियेत भाग घेणा-या सर्वांना ऑनलाईन नोंदणी [Registration] https://jalnaco.abcprocure.com या संकेतस्थळावर करणे आवश्यक आहे. ऑनलाईन नोंदणीकरिता ई-मेल आय.डी, पॅनकार्ड मोबाईल क्रमांक व डिजीटल सिग्नेचर अनिवार्य आहे.
3. यशस्वी लिलावधारकाने वाळुसाठयाचा ताबा घेतल्यानतंर वाळुसाठयाची संपुर्ण जबाबदारी लिलावधारकावर राहील, ताबा घेतल्यानतंर वाळुसाठा कमी जास्त झाल्यास याची सर्वसवी जबाबदारी लिलावधारकांवर राहील.
4. ई-निविदा / ई-ऑक्शनमध्ये भाग घेणा-यांनी अर्जासोबत आयकर विभागाचे पॅनकार्ड, आयकर विभागाचे टिन प्रमाणपत्र, मागील वर्षी दाखल केलेल्या आयकर रिटर्नसची प्रत, फर्म किंवा कंपनी असल्यास रजिस्ट्रेशनची प्रत, रहिवासी पुरावा इ. कागदपत्रे साक्षांकित करुन स्कॅन करुन जोडणे आवश्यक आहे. जे लिलावधारक वरिल प्रमाणे कागदपत्रे जोडणार नाहीत त्यांना ई-निविदा अथवा ई-ऑक्शनमध्ये भाग घेण्याकरिता अवैध ठरविण्यात येईल.
5. ई-निविदा / ई-ऑक्शनव्दारे लिलावात भाग घेणा-या व्यक्तीला रुपये 3,00,000/- किंवा ऑफसेट प्राईसच्या 20% यापैकी जी आधिक असेल ती तेवढी रक्कम अनामत [EMD] म्हणून नेट बॅकिंगव्दारे District Mining Officer Jalna यांचे ICICI बॅक खात्यामध्ये वर नमूद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन ऑनलाईन जमा करावी लागेल. ज्या वाळु गटाची आफसेट प्राईस ही रुपये 10,00,000/- (रुपये दहा लक्ष) पेक्षा कमी असेल तर हातच्या किंमतीच्या 20% अनामत म्हणून भरावी लागेल अनामत रक्कम लिलावधारकाने लिलावाचे मुदतीत सर्व अटि व शर्तीचे योग्य रित्या पालन केल्यास, लिलावाची मुदत संपल्यानंतर परत करण्यात येईल. लिलावाच्या अटि व शर्तीचे पालन न केल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.
6. तहसिलदार यांनी प्रस्तावीत केलेल्या वाळू साठयाच्या ठिकाणी अपेक्षित वाळू साठा आहे किंवा नाही, वाहतूकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध आहेत किंवा नाहीत, याची लिलावापुर्वी खात्री करुन घेण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहिल. याबाबतीत लिलाव मंजुरीनतंर कोणत्याही तक्रारीचा विचार केला जाणार नाही किंवा या कारणांसाठी लिलावात भरणा केलेली कोणतीही रक्कम परत करण्यात येणार नाही.
7. ई-निविदा / ई-ऑक्शन मधील सबंधीत वाळू साठयाची सर्वोच्च किंमत स्विकारल्यानंतर त्यापैकी ¼ (25%) रक्कम District Mining Officer Jalna यांचे ICICI बॅक खात्यामध्ये त्याच दिवशी ऑनलाईन जमा करावी लागेल.
8. सर्वोच्च किंमतीपैकी उर्वरीत 3/4(75%) रक्कम 07 दिवसाच्या आत संबधित तहसिल कार्यालयात एक रक्कमी भरणा करण्यात येईल. उर्वरीत ¾ (75%) रक्कम जमा करण्याच्या हमीचे दायीत्व स्वीकारणा-या दोन व्यक्तीसी लिलावधारकाने स्वखर्चाने खरेदी केलेल्या रुपये 100/- इतक्या रकमेच्या मुद्रांकित (स्टॅम्प पेपर) कागदावर शपथपत्र करुन दयावे लागेल. असे शपथपत्र करुन न दिल्यास त्यांने भरलेली 1/4(25%) रक्कम जप्त करण्यात येईल व सबंधीत वाळूसाठयाचा फेर-लिलाव करण्यात येईल. तसेच विहित कालावधीत वरिल प्रमाणे शपथपत्र सादर न केल्यास परिणामी निविदा / लिलावधारकास होणा-या कोणत्याही नुकसानीची जबाबदारी शासनावर राहणार नाही.

9. लिलावधारकाने / निविदाधारकाने लिलावाची उर्वरीत (75%) रक्कम **10 दिवसात** न भरल्यास त्यांनी भरणा केलेली 25% रक्कम जप्त करुन संबधित लिलावधारकास संपूर्ण राज्यासाठी काळया यादीत टाकून कोणत्याही जिल्हयात लिलावात भाग घेण्यासाठी अपात्र ठरविण्यात येईल.

10. उद्योग उर्जा व कामगार विभाग यांचेकडील अधिसुचना दि.01.09.2016 अन्वये लिलवात जाणा-या वाळुघाटात असलेल्या वाळुसाठ्याच्या स्वामीत्वधन रकमेच्या (उपलब्ध वाळुसाठा x रु.400/- प्रति ब्रास = एकुण स्वामित्वधन) याच्या 10% अंशदान रक्कम म्हणुन जिल्हा खनिज प्रतिष्ठाण जालना या नावाने धनाकर्षाव्दारे या कार्यालयाकडे सादर करावा लागेल, सदरील रक्कम ही ना-परतावा असेल.

11. आयकर अधिनियमातील तरतूदीनुसार लिलावातील सर्वोच्च किंमतीच्या अनुषंगाने टिडीएस देणे लिलावधारकास बंधनकारक राहिल. तसेच त्यांना विक्रीकर खात्याकडे नियमानुसार विक्रीकर शासन जमा करणे बंधनकारक राहिल.

12. लिलावधाकास पर्यावरण शुल्कापोटी, सर्वोच्च किंमतीच्या 02% रक्कम ही धनाकर्षाच्या स्वरुपात पर्यावरण शुल्क म्हणून दयावी लागेल. त्याने लिलावातील अटी व शर्तीचा भंग केल्यास सदरची रक्कम जप्त करुन त्यांचेवर नियमानुसार गुन्हा दाखल करण्यात येईल.

13. वाळुसाठयाचा ठेका ज्यावेळी रद्द करण्यात येईल, अशा वेळेस त्या वाळूसाठयाचा नव्याने लिलव करण्यात येईल. फेर-लिलावात पूर्वीच्या किंमतीपेक्षा कमी किंमत आल्यास, फरकाची रक्कम पूर्वीच्या लिलाव धारकाकडून जमीन महसूलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल. तथापी फेर-लिलावात पूर्वीच्या किंमती पेक्षा अधिक रक्कम आल्यास त्यावर पूर्वीच्या लिलावधारकाचा कोणताही हक्क राहणार नाही.

14. वाळुसाठयाच्या लिलाव मंजूरीचे आदेश निर्गमीत केल्यानंतर लिलावधाकाने वाळुसाठयाचा ताबा 02 दिवासाच्या आत घेतला पाहिजे व वाळूसाठयाचा ताबा घेतल्याच्या दिनांकापासुन या कार्यालयामार्फत निश्चित करुन देण्यात आलेल्या कालावधीतच लिलावधारकास वाळुसाठा उचल करणे बंधनकारक राहील.

15. प्रत्येक महिन्याच्या दुस-या व चौथ्या रविवारी वाळूसाठा उचल न करणे लिलावधाकरकास बंधनकारक राहिल व या दिवशी कोणत्याही परीस्थितीत वाळुसाठा उचल करता येणार नाही. जर उचल केले तर त अवैध उत्खनन समजून नियमानूसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

16. वाळूची उचल करतांना किंवा त्याची वाहतुक करतांना खाजगी मालमत्तेस कोणतीही हानी / नुकसान पोहचल्यास त्याची भरपाई करण्याचे दायीत्व लिलावधारकावार राहील. अशा हानीची / नुकसानीची परिगणना सक्षम अधिका-यांकडून करण्यात येईल व त्याबाबतचा त्याचा निर्णय अंतीम राहिल व अशी रक्कम थकीत जमीन महसूलाच्या वसूलीप्रमाणे सबंधीत लिलावधाकाकडून वसूल करण्यात येईल.

17. लिलावात मंजूर केलेल्या वाळू साठयातुन वाळू उचलण्याची अंतीम मुदत वरीलप्रमाणे अट क्र.13 मध्ये नमुद केल्याप्रमाणे राहील. लिलावात दिलेल्या वाळुसाठयातुन करारात नमूद केलेल्या कालावधीत, वाळूची उचल करण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. वाळूसाठयात अपेक्षित वाळू साठा नाही, रस्ते उपब्ध नाहीत, तसेच मानवी वा नैसर्गीक आपत्तीच्या कारणास्तव सदर कालावधी कोणत्याही परिस्थीत वाढवून दिला जाणार नाही व वाळुसाठा बदलून दिला जाणार नाही. तसेच कोणत्याही परिस्थित शासन जमा केलेली वाळूसाठयाची रक्कम परत केली जाणार नाही.

18. वाळुसाठयातील वाळु वाहतूकीसाठी अस्तिवात असलेले रस्तेच लिलावधारकाने वापरावयाचे आहेत. तसेच वाहतूकीसाठी नवीन रस्ता नियमानुसार मिळविण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. रस्ते उपलब्ध नाहीत किंवा वाहतूकीसाठी बंद आहेत, या कारणास्तव कोणत्याही परिस्थितीत वाळू उचल करण्याचा कालावधी वाढून दिला जाणार नाही अथवा वाळुसाठा बदलून दिला जाणार नाही. तसेच कोणत्याही परिस्थितीत शासन जमा केलेली वाळूपट्टयाची रक्कम परत केली जाणार नाही. वाहतूकीसाठी खाजगी जमीनीतून रस्ता मिळविण्याची जबाबदारी ही लिलावधाकाची राहील.

19. वाळूसाठयाचे ज्या क्षेत्राचे वाटप केलेले असेल त्या क्षेत्रातून वाळू उचल करतांना नैसर्गीक संपत्तीस व पर्यावरणास धोका होणार नाही याची सर्व खबरदारी लिलावधारकाने घ्यावयाची आहे.

20. लिलावधारकाने वाळुसाठयाच्या जागेवर वैदयकीय प्राथमीक उपचार सुविधा उपलब्ध करुन दयावी.

21. लिलावधारकाने गावक-यांचे निस्तार हक्कास बाधा पोहचविता कामा नये.

22. वाळूसाठयाची उचल करतांना अथवा हलवितांना अपघात झाल्यास त्याबाबत लिलावधारक जबाबदार राहील तसेच लिलावधारकाने अपघाताची माहिती तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात तसेच जिल्हाधिकारी कार्यालयास दयावी.
23. लिलावधारकाने वाळूची केलेली उचल, विक्री केलेल्या वाळूबाबतची दैनंदिन हिशोब नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. ही नोंदवही व इतर हिशोब कागदपत्रे जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म निरीक्षक, महसूल अधिकारी तसेच जिल्हाधिकारी व भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालयातील निरीक्षण करणा-या अधिका-यांसाठी उत्खननाच्या जागेवर उपलब्ध करुन दयावीत.
24. लिलावधारकांनी त्यांना मंजूर केलेल्या वाळुसाठयातूनच वाळूची उचल, विक्री केल्याबाबत दैनदिन हिशोब ठेवावा. तसेच त्याबाबतचा सविस्तर अहवाल संबधित तहसिल कार्यालयात प्रत्येक आठवडयाच्या सुरुवातील सादर करण्यात यावा.
25. लिलावधारकाने लिलावाच्या अटि व शर्तीचे तसेच केंद्र शासनाच्या वन व पर्यावरण विभागाकडिल दि.24.12.2013 मधील ऑफीस मेमोरॅडम मधील तसेच महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विनियमन व विकास) नियम 2013 व वाळू निर्गती धोरण शासन निर्णय दि.12.03.2013 तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 मधील तरतूदी नुसार लागू असलेल्या नियमांचे पालन करणे बंधनकारक राहिल. त्याच प्रमाणे वाळुचा पूर्ण उपयोग गौण खनिज म्हणूनच केला पाहिजे. अवैध वाळू उत्खनन / साठा /वाहतूक प्रकरणात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 मधील 48(7) व (8), महाराष्ट्र शासन राजपत्र दि.17.08.2015 तसेच तसेच महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम 2013 मधील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.
26. वाळुची वाहतूक करतांना वाहनातील वाळू प्लॅास्टीक पेपरने / ताडपत्रीने आच्छादीत करुनच वाळूची वाहतूक करणे बंधनकारक आहे. अशी वाहतूक न केल्यास दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.
27. लिलावधारकाने वाळूसाठयाची वाहतुक करतांना होणारे प्रदुषणासबंधी, प्रदुषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करावी.
28. अंदाजीत परिमाणापेक्षा अधिक वाळूसाठा संबधित वाळुसाठयात असल्यास, त्यावर लिलावधारकाचा कोणताही अधिकार राहणार नाही व अंदाजीत परिमाणापेक्षा अधिक उचल करण्यास लिलावधारकास परवानगी देता येणार नाही. तसेच नमूद अंदाजीत वाळुसाठयापैकी वाळु कमी भरल्यास त्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील.
29. मा.न्यायालयाने कोणत्याही वाळुसाठयाबाबत काही आदेश / निर्णय दिल्यास, सदर आदेश / निर्णय लिलावधारकावर बंधनकारक राहतील व मा. न्यायालयाचे आदेश / निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
30. शासनाच्या पुर्व परवानगीशिवाय लिलावधारकास वाळुसाठयाचा ठेका दुस-या कोणाकडेही हस्तांतरीत करता येणार नाही, किंवा दुस-या कोणालाही चालविण्यास देता येणार नाही किंवा निविदा उघडुन मंजूर केल्यानंतर भागीदारीही घेता येणार नाही, असे केल्यास सदर वाळुसाठयाचा लिलाव रद्द केला जाईल.
31. वाळूची उचल व वाहतुक केवळ सकाळी 06.00 ते सायंकाळी 06.00 या कालावधीतच करता येईल. या कालावधीनंतर केलेले उत्खनन अवैध समजून नियमानुसार कारवाई करण्यात येईल व फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल.
32. मंजूर साठ्याव्यतिरिक्त इतर ठिकाणांवरुन केलेल्या अवैध उत्खनन / वाहतूकीची प्रकरणे उघडकीस आल्यास अशा प्रकरणी संबंधीत ठेकेदार / लिलावधारक / वाहनमालक –वाहनचालक दोषी आढळल्यास त्यांच्याविरुध्द प्रचलित नियमानूसार कारवाई करण्यात येईल. प्रचलित नियमानुसार कारवाई करताना संबंधिता विरुध्द भारतीय दंड विधी संहिता कलम 379 प्रमाणे गुन्हा दाखल करणे, वाहन जप्त करणे, दंडात्मक कारवाई करणे, फौजदारी स्वरूपाची कावाई करणे इत्यादी स्वरूपाची कारवाई करण्यात येईल.
33. वाळू वाहतूक करणारे वाहने रहिवासी भागात उभी करू नये .
34. वाळूची वाहतूक करणा-या वाहनांचे सक्षम प्राधीकरणाने दिलेले Pollution Under Control प्रमाणपत्र वाहनासोबत बाळगने आवश्यक आहे.
35. लिलावधारकाने त्यांच्या मंजूर संपूर्ण क्षेत्रावर प्रकाश पडेल अशा रितीने लाईटची व्यवस्था करणे आवश्यक आहे.
36. लिलावधारकाने त्यांना मंजूर केलेल्या क्षेत्रात जाण्यासाठी एकच बाहेर रस्त्यावर पडण्यासाठी एकच मार्ग असेल आणि उर्वरीत सर्व क्षेत्र अशा प्रकारे बंद करावे की, ज्यामूळे तेथे एकही वाहन आत किंवा बाहेर जाऊ शकणार नाही. या साठी

लाकडी / तारेचे / लोखंडी भिंतीचे / दगडाचे कुंपण किंवा मोठमोठी दगडे जी हलविता येणे अशक्य आहे ती ठेवणे किंवा खंदक /चर खोदने आवश्यक असेल.

37. लिलावधारकास शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या/नतंर प्राप्त होणा-या सुचनेनुसार गौण खनिज वाहतुक परवाना व त्याबाबतच्या अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील. सदरील बाबीचे पालन न केल्यास नियमानुसार कार्यवाही प्रस्तावीत करण्यात येईल.

38. वाळू / रेती वाहतूक करणा-या वाहन चालकाकडे वैध वाहतुक परवाना आहे किंवा नाही, या बाबतचे निरीक्षण संबंधीत महसूल यंत्रणेकडुन तथा नियुक्त भरारी पथकाकडुन केले जाईल. अशा निरीक्षणाच्या वेळी संबंधित वाहनचालकाकडे वैध वाहतुक परवाना आढळला नाही किंवा निर्दिष्ट कालावधी संपलेला असेल तर सदर वाळूचे उत्खनन/वाहतूक अवैध समजून त्याविरूध्द महाराष्ट्र जमीन महसूल संहिता 1966 मधील कलम, 48 (7), महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम 2013, आणि संदर्भाधीन दि.12.03.2013 तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र दि.17.08.2015 मधील निर्धारीत तरतूदीनूसार त्याविरूध्द कडक कारवाई करण्यात येईल.

39. वाळू/रेती लिलावधारकाने त्याच्याकडे असलेल्या वाहतुक परवान्यामध्ये नमुद परिमाणापेक्षा अधिक परिमाणची रेती/वाळू वाहून नेत असल्याचे आढळून आल्यास त्या वाहनातील संपूर्ण गौणखनिज अवैध आहे असे समजून त्यावर नियमानूसार दंडात्मक कारवाई तसेच क्षमतेपेक्षा जास्त वाहतूकी बाबत मोटार वाहन कादयानूसार कारवाई करण्यात येईल. दंडनिय कारवाईबरोबर जप्त केलेल्या रेतीचा लिलाव करण्यात येईल. त्याचप्रमाणे लिलावधारकाने रेती/वाळूचे केलेले उत्खनन, विक्री व वाहतूक केलेल्या रेती बाबतची दैनंदिनी हिशोब नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. हि नोंदवही व इतर हिशोब कागदपत्रे खनिकर्म अधिकारी, खनिकर्म निरिक्षक, महसूल अधिकारी, अव्वल कारकून, मंडळ अधिकारी, तलाठी तसेच जिल्हाधिकारी व भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयातील निरीक्षण करणा-या अधिका-यासाठी वाळुसाठ्याच्या जागेवर खालील नमुन्यात उपलब्ध करून दयावीत.

| **मासिक अहवाल** | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र | वाळुसाठ्याचे नांव | दिनांक | वाहन क्रमांक | वाहनाचे नांव/ प्रकार | वाहन क्षमता | वाहन वाळुसाठ्याचे निघण्याची वेळ | वाहन पोहचण्याचे ठिकाण व वेळ | वाळु खरेदी करणा-याचे नांव व पत्ता | विकलेली वाळु (ब्रास) | वाहतुक परवाना क्रमांक |
| | | | | | | | | | | |
| **दैनंदिन नोंदवही** | | | | | | | | | | |
| अ. क्र | वाळुसाठ्याचे नांव | दिनांक | वाहन क्रमांक | वाहनाचे नांव/ प्रकार | वाहन क्षमता | वाहन वाळुसाठ्याचे निघण्याची वेळ | वाहन पोहचण्याचे ठिकाण व वेळ | वाळु खरेदी करणा-याचे नांव व पत्ता | विकलेली वाळु (ब्रास) | वाहतुक परवाना क्रमांक |
| | | | | | | | | | | |

40. लिलावधारकाने त्यांचे लिलाव क्षेत्रात येणा-या प्रत्येक वाहनांची नोंदणी जिल्हा खनिकर्म अधिकारी संबंधीत तहसीलदार यांचेकडे करून या कार्यालयाने निर्गमीत केलेले स्टीकर्स प्रत्येक वाहनाला लावणे आवश्यक आहे.

41. वाळूचे अनाधिकृत उचल व वाहतूक टाळणेसाठी जिल्हा प्रशासनामार्फत वेळोवेळी देण्यात येणारे निर्देशनाचे पालन करणे लिलावधारकास बंधन कारक राहील.

42. कोणतीही पुर्वसुचना न देता वाळुसाठयाचा ताबा रद्द करण्याचा अधिकार मा.अपर जिल्हाधिकारी जालना यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहे

43. महाराष्ट्र शासन निर्णय महसुल व वनविभाग क्रमांक गौखनि-10/0512/प्र.क्र.300/ख, दि.12.03.2013, दि.03.01.2018 व दि.19.10.2013 व वेळोवेळी दिलेल्या सुचनामधील अटी व शर्ती, ई-निविदा मधील सर्वोच्च देकार धारकास बंधनकारक राहतील.

44. ई-निवीदा /ई- ऑक्शन मधील अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे, ई-निविदा /ई- ऑक्शन प्रक्रियेत वेळेवर निर्णय घेण्याचे तसेच ई-निविदा /ई-ऑक्शन मधील सर्वोच किंमत स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा संपूर्ण अधिकार मा.जिल्हाधिकारी/मा.अपर जिल्हाधिकारी जालना यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहे व यांचा निर्णय अंतीम राहील तसेच ई-निविदा धारकाना तो पालन करणे बंधनकारक राहील.

45. लिलावधारकास आदेशात नमुद करण्यात आलेल्या प्रमाणेच वाळुसाठा वाहतुक करण्यासाठी कालावधी मिळणार असुन कोणत्याही नैसर्गीक अथवा मानवी कारणांमुळे वाळुसाठा उचल करता आला नाही तर याबाबतची सर्वस्वी जबाबदारी लिलावधारकावर राहील व याबाबत लिलावधारकास कोणतीही भरपाई अथवा वाळुसाठा उचल करण्यास मुदतवाढ दिली जाणार नाही.

राजेश जोशी

**निवासी उपजिल्हाधिकारी तथा**

**प्र.अपर जिल्हाधिकारी जालना**

## Details of Sand Stocks to be auctioned at Sawangi & Deulzari Ta.Jafrabad and Uswad Ta-Mantha Dist-Jalna.

| Sr.No | Name of Sand Stock | Taluka | Gut No/Survey no | Total Sand Stock Quantitay | Offset price per brass | Approval for Offset price From Collector Office, Jalna | 25% Deposit amount in Rs. | Period for Lifting Sand stock ( In Days) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1 | सावंगी | जाफ्राबाद | मौ.सावंगी येथील दर्गाजवळील कुकुटपालन शेजारी व दर्गाच्या पाठीमागे जुने गावठाण जवळ | 400 | 1552 | 620800 | 155200 | 30 |
| 2 | देऊळझरी | जाफ्राबाद | मौ.देऊळझरी येथील गट नं.191, जुने गावठाण व स्मशान भुमीजवळ | 550 | 1552 | 853600 | 213400 | 45 |
|  | उस्वद | मंठा | मौ.उस्वद येथे जिल्हा खनिकर्म अधिकारी, यांनी दि.20.06.2018 रोजी जप्त केलेल्या वेगवेगळया 05 ठिकाणावरील वाळुसाठे. | 750 | 1552 | 1164000 | 291000 | 60 |

Rajesh Joshi

Residental Deputy Collector, and

**Additional Collector, Jalna**